अनुभवपुष्पे

(चिंतनासाठी काही अनुभव-वचने)

भाग : ३

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

अनुभवपुष्पे

भाग-३

(चिंतनासाठी काही इंग्लिश-मराठी
अनुभव-वचने)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** अनुभवपुष्पे - भाग ३ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : फेब्रुवारी २०१७

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : **www.pethekaka.com**

युट्यूब चॅनेल : **Shri Pethe Kaka**

अँड्रॉईड ॲप : **SadhanNandadeep** (साधननंदादीप)

आयुष्यात अडचणी अपरिहार्य आहेत. राजाच्या आणि रंकाच्याही. अडचणीचं एक वैशिष्ट्य आहे, ती आपला एक हात पकडते.

म्हणून एक शक्य आहे. अडचणीनं आपला एक हात पकडला, तर दुसरा हात वापरून पहिला सोडवून घ्यायचा असतो. ते आपण वेळेत केलं नाही, म्हणजे अडचण आपला दुसराही हात पकडते. मग हताश व्हायला होतं !

शाळेतला बुद्ध्यांक कमी असला, तर पुस्तकी अभ्यास समजायला, कमी-जास्त मार्क मिळायला कारणीभूत होतो. स्वतःला व शाळेपुरताच त्रास देतो.

पण जीवनाच्या आकलनातला बुद्ध्यांक कमी असला, तर तो मात्र स्वतःला, इतरांनाही आयुष्यभर त्रास देतो आणि दुर्दैवानं ते कळतही नाही! अधिक नुकसान म्हणजे त्याचा दोष आपण इतरांना देतो !

असामान्य माणसंसुद्धा अनेकदा अस्वस्थ असतात. त्यापोटी अनेक उपक्रम, कार्यं चालू असतात. कारण जग व्यवस्थित चाललेलं नाही, असं 'त्यांना' वाटत असतं !

वस्तुतः जग व्यवस्थित चाललेलंच असतं. फक्त ते 'त्याच्यापरीनं' ! ते लक्षात घेतलं तर असामान्यांची वाचलेली शक्ती त्यांना स्वतःला खऱ्या गरजेच्या कामी वापरता येईल!

अनेक 'भक्तां'ना आता ई-पूजा, ई-अभिषेक सोयीचे वाटतात. ई-मेल व ई-मनी एवढं बसल्याजागी केलं, तर अशा गोष्टी करून देणारेही उपलब्ध झाले आहेत.

पण तहान भागवायला ई-पाणी, पोट भरायला ई-प्रसाद आणि नडीच्या हाकेला ई-भगवंत चालणं अवघड आहे, हे वेळीच लक्षात घेतलेलं बरं !

देवाच्या प्राप्तीसाठी पूर्वार्धात अनेकदा गुरूंकडून आघात सोसावे लागतात.

प्राप्तीनंतर जगाकडून स्वार्थासाठी वापर, मागण्या, कृतघ्नपणा,देवघेवी वृत्ती - असे आघात सोसावे लागतात.

तरीही देवत्वाइतकं सर्वश्रेष्ठ उदिद्ष्ट नाही. कारण आधी प्रतीक्षेत आणि नंतर प्राप्तीत होणाऱ्या अंतर्यामीच्या आनंदासारखं जगात दुसरं काही नाही !



देणारा द्यायला समर्थ आणि उदार असावा, घेणारा घेण्याला पात्र आणि उत्सुक असावा, त्यातही अशांची शुभ मुहूर्तावर भेट व्हावी - तर प्रपंचाच्या व्यवहारातसुद्धा अवर्णनीय आनंद होतो.

खऱ्या गुरुशिष्यांचं तसं होतं ! मग तसे महात्मे, त्यांचं अजोड कार्य - जगाला शतकानुशतकं निरंतर प्रेरणा देतं!



लौकिक भाषेत ईश्वरदर्शन हा खूप खोल जमिनीतला आनंददायी, निर्मळ झरा आहे. काहींना जमिनीत जरा खोदलं की, तो लगेच मिळावा असं वाटतं.

तो कुणालाही मिळतो, पण त्यापूर्वी आपल्या जमिनीतले दगड, डबर, खडी, चिखल, काचा, तुकडे - अशा अनेक चांगल्या-वाईट गोष्टी खोदून फेकून द्याव्या लागतात !

चष्म्यातून पाहाताना काही वेळा काळे डाग दिसू लागतात. मनुष्य काच बाहेरून पुसतो.चष्मा परत लावला तरीही डाग तसेच दिसतात,जग स्वच्छ दिसत नाही. मग कळतं, काचेला आतून डाग आहेत. ते पुसल्यावर जग स्वच्छ दिसतं.

जगातले दोष, आपलं असमाधान - यांच्या बाबतीतही असं अंतर्यामच स्वच्छ करावं लागतं ! जग सुधारण्याचा उपयोग कमीच असतो !

कोट्यवधी खटले व त्यांतली निरंतर वाढ, असंख्य निकालांची जवळजवळ अशक्यता ही मुळात न्यायालयीन, कार्यकारी मंडळाची अकार्यक्षमता नव्हे.

माणसा-माणसातल्या सामंजस्य, तडजोड, स्वामित्वाच्या फोल कल्पनांचा त्याग, निर्लोभता, निःस्वार्थ, करुणा, प्रेम - अशा श्रेष्ठ मूल्यांचा ऱ्हास होय !



खरे गुरू विशालतेला कल्पनातीत महान आणि मीपणाला कल्पनातीत लहान होतात. म्हणूनच खऱ्या गुरूंचा शोध घ्यावा लागतो !

जिथं ढोल, नगारे, ताशे, भव्य व्यासपीठं आहेत,तिथं गुरू कशाला शोधावे लागतील ?

इच्छा असो-नसो, ते दिसतातच आणि अर्थातच बहुधा ते खरे गुरू नसतात ! म्हणून संतांना 'गुरुशोधा'साठी वणवण करावी लागलेली दिसते !



चांगल्या-वाईट संगतीचा परिणाम अपरिहार्य आहे. आजपर्यंत कुसंगती ही काही व्यक्ती, निषिद्ध खाणं-पिणं, वस्तू - यांपुरती होती. नुकसानही करीत होती,आहे.

तंत्रज्ञानानं चांगल्या गोष्टी आणल्या,पण टीव्ही, नेट, मोबाईलद्वारे सर्वांत हानिकारक कुसंगतही आणली. तिनं मेंदू-मनात सोडलेले कुविचारांचे अदृश्य व्हायरस नष्ट करणं तंत्रज्ञानाच्याही हातात नाही !



परमार्थ ही उंच पायरी आहे. देवप्राप्तीसाठी ती ओलांडणं गरजेचं आहे. तरी ती थेट ओलांडणं अशक्यप्राय आहे.

म्हणून त्याआधी प्रपंचाची मधली, छोटी पण निसरडी व डळमळीत पायरी ठेवली आहे. ती नीट चढता आली, तर मग परमार्थाची पायरी उंच असली तरी चढायला जवळ पडते आणि दोन्ही पायऱ्यांचं स्थान आणि महत्त्वही कळतं !



ज्यांना साधना ही एक ऑक्टिव्हिटी-कर्म वाटतं, त्यांना त्यातून एरवीच्या कर्मांसारखं बरं-वाईट फळ मिळतं. देव-समाधान नाही ! उलट कर्मांचे परिणामही भोगावे लागतात.

ज्यांना परमार्थ ही-आपली कर्तव्यं निरपेक्षपणे करताकरता, सर्वांच्यातल्या भगवंतावर निःस्वार्थी प्रेम करीत जगण्याची पद्धत वाटते, त्यांना अशी साधना -देव म्हणजे शाश्वत समाधान देते !



अपयशं, फसवणुकी, अपकीर्ती, अपघात, मोठी आजारपणं - ही कुणालाही नकोशी वाटतात. त्यामुळं होणारा त्रास, इतर नुकसानही अनेकांना नकोसं वाटतं.

पण असले प्रसंग हे भगवंताची, त्याच्या अंतिम सामर्थ्याची ओळख व्हायला, त्याच्याकडं जायला उपयोगी पडणारे जवळचे रस्ते आहेत, अर्थात आपण समजून घेऊन ते चालले तर !



The Ego destroyes one beyond imagination.

The paradox is, except a few, everybody is caring to protect it at any cost and later lament for doing so.

The final paradox is, mostly nobody learns any lesson from it !

If you have to live in the world, stay with the family, interact with the people, serve in some company or that, carry on your business, earn your livelihood and so on, you have to talk.

But you can not talk either true or false.

The only way you can 'talk' - is 'double-talk' !



You need not plan, read literature, take any formal education, experiment, seek advice to discard your body, ***because*** nature is there to do it, ***without*** any help, efforts from you !

The real useful thing ***worthwhile*** to discard is to discard ***mind*** !

Please remember, it will not automatically dissolve and there is ***nobody*** else to do it !





Excessive desire to live, may or may not elongate physical existance, but it is sure to make ***present smooth life*** disturbed.

As it will make the ***life*** *today* unnecessarily fast, full of more and more unfulfilled tasks, avoidable unrest and strains in the relations - ***ultimately*** destroy the present !



No doubt, we have to guard against ***misuse*** *and* ***loss*** of every drop of *water* !

But one must equally remember that water is ***not 'the only' grace*** of God on mankind. We have to find out ***all other graces*** **!**

And what is true of every drop of water, ***is also true*** of each and every Grace on us and live accordingly !

If I can ***only quote*** pieces of existing knowledge, holy scripts, others' experiences, scientific laws, information, inventions and discoveries - ***it is alright*** **!**

But, ***Behold*** **!** I should understand and accept that I am ***lacking originality*** **!**

And, therefore much is to be done !

One can not ***deny*** the world altogether, as we feel, see and experience it.

But, if ***one has to free oneself*** from the sorrows and pains of the world, ***one can*** change one's attitude, attachment to it, the reality assigned to it, one's degree of identification with it and ***so can be*** rid of the clutches of it !



The beads of ***Maala*** have not only a material existence, physical movement. But with every movement, ***they remind*** supreme existence felt from within.

They are not 'beads'. They represent **'*vibrant beats*'** of heart ***full of*** gratitude towards the eternal, the Divine !



Our *God* ***given senses*** have deprived us of the realisation of ***God himself*** **!**

Micro too near to be seen, ***macro*** too far to be seen and ***so on...!***

Ultimately, we put the blame on God for our sorrows and miseries, or simply deny his existence !

That is one of the root causes of ***human tragedy*** **!**

Normally one *is* unable to accept or atleast reconcile with ***'a person'*** near, dear, related.

How one *is* likely to accept or reconcile with God, who has created and has been creating 'innumerable' persons of all sorts ?

Being *too* ***much ideal***, is likely to be *too* ***much impractical***, so not of much use to the individual or to the world.

So, compromise is the golden mean. But to ***strike the balance*** is very delicate.

As ***core of the ideal and ease in the practical*** are not to be lost !



From ***ancient times*** one may come accross a ***lasting truth***.

It is that, holy books and discourses, however great, *have* ***failed***. Prabably because, the readers and the listeners take them as '***for information only'*** **!**

While, actually, they are *'for* ***necessary action only'*** **!**



Death is taken as a ***common and inevitable fact*** of life. Though physically it is the same with all, ***it differs*** in case of Saints.

Death of a Saint is ***not merely*** a worldly fact or loss. It is an ***irreparable loss*** of an all - accessible, powerful, direct and ***strong connection*** with God !

There are various Saints. The teachings of these Saints also ***vary apparently***. The ***devotees*** of these variety of Saints are ardent and sometimes aggresive about their own path.

In fact, these various teachings, and the Saints themselves have best and lasting ***coherent interconnectivity***, but most of the ***devotees lack it*** **!**

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प : स्वरूप व पद्धती
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली
२१. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा :
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना :
३०. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १
३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा
३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ
३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश
४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत
४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)
४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)
५५. शिदोरी
५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २
५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २
६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी
६२. श्रद्धेची पहाट
६३. उपासनामाला

६४. पावनपथ
६५. अनुभवपुष्पे - भाग १
६६. कृतज्ञतामार्ग
६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात
६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी :
(मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)
६९. संतबोध : भाग ४
७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार
७१. उत्तरायण -भाग ३
७२. अनुभवपुष्पे - भाग २
७३. श्रद्धा
७४. अनुभवपुष्पे - भाग ३
७५. अर्घ्य
७६. जीवनचिंतन
७७. स्वास्थ्यसंवाद
७८. वचनांजली भाग १
७९. अक्षरायण
८०. वचनांजली भाग २
८१. भावगीता

अनुभवपुष्पे





संवेदनशील व सावध व्यक्तींना
जगण्याच्या शाळेत पदोपदी सुगंधी भेटी मिळतात.....
विशालता, सत्याची झलक, पुढच्या प्रगतीच्या दिशा
आणि बरंच काही...
ती देणारी असंख्य छोटी छोटी अनुभवपुष्पंही...
संस्मरणीय... !